प्रथम क्रमांक : राधिका संदीप देशपांडे (४)

# पुष्पक 1

## (एक शोधकथा)

आज सई अतिशय खुश होती. कारणही तसंच होतं. मनुष्याचं एक स्वप्न असतं की आपल्या आयुष्यात काहीतरी नेत्रदीपक करायचं. आपल्या हातून अशी एखादी कामगिरी घडावी की आयुष्याचं सार्थक व्हावं. बऱ्याच लोकांना ते संपूर्ण आयुष्यभर साध्य होत नाही. पण सईचं असं नव्हतं. संधी तिच्या दारात चालत आली होती.

सईला एका रिसर्च टिमबरोबर श्रीलंकेत जायला मिळणार होतं. श्रीलंकेच्या जंगलात रामायणकालीन अवशेषांचे शोध लागतच असतात. असाच एक मोठा शोध लागण्याची चिन्हे दिसत होती. खरंतर सई कोणी शास्त्रज्ञ किंवा पुरातत्त्वतज्ञ नव्हती. ती एक वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी होती. तिला फोटोग्राफीची अत्यंत आवड होती व हिच आवड तीनी व्यवसाय म्हणून स्विकारली होती. तिनी काढलेल्या अनेक फोटोजना कित्येक बक्षिसेही मिळाली होती. तीला माणसांचे फोटो काढण्यापेक्षा प्राणी, पक्षी खासकरून पुरातन मंदिरे, जुन्या वास्तुंचे अवशेष यांचे फोटो काढण्यात जास्त रस होता. तिने काढलेल्या 'अजिंठा-वेरूळ' येथील फोटोंना आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त झाला होता. "सईने काढलेल्या या फोटोवरून कोणीही प्रत्यक्ष तिकडे न जाता या लेण्यांचा अभ्यास करू शकतो. प्रत्यक्ष तिकडे जायचीही गरज नाही, इतके उत्तम बारकावे यात टिपले गेले आहेत." असे उद्गार परिक्षकांनी तिच्याबद्दल काढले. याच कारणासाठी तिला या रिसर्च टिममध्ये होण्यास आलं होतं. जायच्या आधी त्यांच्या टिम लीडरनी सर्व सदस्यांची मिटींग घेऊन माहिती दिली.

"मदुराई जवळ 'शिवखोडा' म्हणून एक



Scanned with OKEN Scanner

छोटंसं गाव आहे. तिथले जमिनदार श्री. राजेश्वर राणा त्यांच्या कित्येक पिढ्या याच गावातल्या. तिथल्या जवळजवळ सगळ्या जमिनींचे ते मालक आहेत. गावातले लोक त्यांना राजाप्रमाणे मान देतात. शिवखेडा गावाच्या पश्चिमेला एका पुरातन वाड्याचे अवशेष होते म्हणजे आजही आहेत. लोकं तो वाडा रावणाच्या भावाचा बिभिषणाचा आहे असे सांगतात. पण त्याविषयीचे कोणतेही पुरावे उपलब्ध नव्हते. तो वाडा असलेली जमीन राणासाहेबांच्या मालकीची आहे. तो वाडा कमी महालच वाटावा इतका त्याचा प्रचंड विस्तार आहे. त्याच्या दुसऱ्या बाजूला समुद्र आहे. पूर्वी होड्या डायरेक्ट महालात येण्याची सोय असावी कारण तसा मार्ग दिसतो. एक महिन्यापूर्वी त्या गावाला भूकंपाचा एक सौम्य धक्का बसला. त्याचबरोबर वाड्याच्या मधोमध शाबित असलेला एक विशाल खांब कोसळला. राणासाहेब त्या ठिकाणी गेल्यावर ही गोष्ट त्यांच्या निदर्शनास आली. त्यांनी मजूर बोलवून तो ढिगारा हटवायला सुरवात केली. काम चालू करताच तो खांब आतून पोकळ असल्याचे त्यांच्या लक्षात आले. इतकंच नाही तर त्यातून दोन फूट लांब आणि दिड फूट रुंद अशी लाकडाची पेटी सापडली. कामगारांनी ती घाबरून बाजूला टाकली, कारण त्यावर एका घुबडाचं चित्र होतं. त्या भागात घुबडाला अशुभ समजतात. राणाजींनी ती बंद पेटी घरी आणली. त्याला कोणतेही कडी-कुलूप नव्हते तरीही ती घट्ट बंद होती. त्यांनी तिला कापण्याचाही प्रयत्न केला, परंतु ती लाकडाची नसून धातूची असल्याचे त्यांच्या लक्षात आले. ती कशानेही भेदली जात नव्हती कि तिच्यावर चरासुद्धा

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

पडत नव्हता. त्याचवेळी राणाजींचा चौदा वर्षांचा नातू तिकडे आला. 'राजवीर' त्याचं नाव तो पेटी उघडण्यासाठी चाललेली राणाजींची खटपट पहात होता. त्याने जवळ येऊन पेटी निरखून पाहिली व एक सुई मागवली. ती सुई घेऊन त्याने घुबडाच्या डोक्यातल्या एका बिंदूमध्ये खुपसली राणाजी तिकडे गंमत म्हणून बघत होते. त्यांच्या मनात आलं, या पेटीने हाय पॉवर ड्रील ला दाद दिली नाही तर सुईला काय पेलेल ? पण आश्चर्य ! ती सुई कापसात शिरावी इतक्या अलगदपणे आत गेली. हवा जाण्याचा स्स..... असा आवाज आला. आणि पेटी उघडली. त्याचबरोबर उघडला दरवाजा एका रहस्याचा .....

त्या पेटीत एक ताम्रपट होता. तो खूप मोठा होता. तो काढताच त्यावर सांकेतिक भाषेत लिहीलेली माहिती, चित्रे होती. राणाजींनी तो ताम्रपट पुरातत्व विभागाच्या ताब्यात दिला. त्यांच्या म्हणण्या-नुसार ती चित्रलिपी होती जी रामायणकाळात वापरली जात असे. तोही अंदाजच होता. त्याविषयी शोध घ्यायचे ठरले, आणि त्या टिममध्ये सईची निवड झाली होती. त्या पेटीचे आणि ताम्रपटाचे फोटो त्यांना पूर्व अभ्यासासाठी पाठवण्यात आले होते. आता ते प्रोजेक्टरवर त्यांना दाखवण्यात येत होते. सई बारकाईने ते पहात होती.

ते सगळे फोटो त्यांच्या समोर होते. सई तिच्या टिम लिडर राजेश महाजन सरांना म्हणाली, "सर हा नकाशा वेगळाच वाटतो नाही? सुरवात एका महालापासून झाली आहे. कदाचीत तो राणाजींना नकाशा सापडला तोच असावा. साधारण असे नकाशे गुप्त खजिन्यांपर्यंत नेत असावे असे वाटते पण या

नकाशाच्या शेवटी जड-जवाहिराची पेटी नाही तर
एका विमानाचे चित्र आहे. हो ना? जरा विचित्रच आहे
सगळं. त्या काळी तर मोटारींचेही शोध लागले
नव्हते आणि विमान? आश्चर्याचीच गोष्ट नाही का?"
सर हसून म्हणाले, "रामायणात रावणाकडे असलेल्या
पुष्पक विमानाचा उल्लेख आहे. आपण क्षेपणास्त्रे,
अणुबॉम्ब, सॅटेलाईट, गुगल अर्थ वरचे नकाशे हे
बनवले म्हणून फार गर्व करतो, अगं पण हजारो
वर्षांपूर्वी हे सर्व अस्तित्वात होते. श्रीकृष्णाचं सुदर्शन
चक्र म्हणजे लेझर वेपनचं उदाहरण होतं जे एक थेंबही
रक्त न सांडता अलगदपणे डोकं कापायचं. त्याकाळचं
ब्रह्मास्त्र म्हणजे आजचा अणुबॉम्ब. तुला माहिती आहे
का कालिदासाने त्याच्या 'मेघदूत' काव्यात त्या
भूभागांचं वर्णन केलं आहे जो ढगाला आकाशातून
दिसला. त्यावेळी सॅटेलाईट वगैरे नव्हते तरीही ते
वर्णन हुबेहुब आहे. आता या नकाशाबद्दल याच्या
शेवटास काय आहे कोणास ठाऊक? पण मला खात्री
आहे की आपण एक खूप मोठा शोध लावणार आहोत."

मग ठरलेल्या दिवशी त्यांची टिम राणांच्या
हवेलीवर गेली. सई पहिल्यांदाच अशा मिशनवर जात
असल्यामुळे उत्साहात होती. त्या पडिक अवशेषांकडे
जाताना तिच्या गळ्यात कॅमेरा लटकत होता. ते
सर्वजण जागेवर गेले. त्या महालाचा विस्तार
पाहून थक्क झाले. आता त्या जागेवर निव्वळ काही
पडीक खांब, भिंती असेच होते. सईने आवश्यक
त्या सगळ्या गोष्टींचे फोटो काढून घेतले.

रात्री सई लॅपटॉपमध्ये सगळे फोटो एडीट
करत होती आणि अचानक तिला ते दिसले
....

Scanned with OKEN Scanner

तीने घाईने सगळ्यांना बोलावले. जो खांब तुटला
होता त्याच्या जवळच्याच भिंतीवर तिला अस्पष्ट
चित्रे दिसली होती. तिच्या कॅमेराने ती अचूक टिपली
होती. तिने एडीट करुन अजून स्पष्ट केली होती.
ती पाहून राजेश सर म्हणाले, "ही चित्रे त्या नकाशा-
सारखीच वाटत आहेत. फक्त ही जास्त डिटेलमध्ये
आहेत. यात त्या रहस्यमयी जागेकडे जाण्याचा मार्ग
या महालाच्या खालून म्हणजेच पाण्यातून दिसतो
आहे." सगळ्यांनीच त्यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला.
दुसऱ्या दिवशी तिकडे भाषातज्ञ आले. त्यांनी
तो पेटीत सापडलेला मूळ नकाशा आणि सईने
काढलेले फोटो यांची संगती लावली. त्यांनी चित्रलिपी
असलेला नकाशा अर्थासहीत समजवला.

"बिभीषण हे आदर्श राजा होते. ते सर्व
प्रजाजनांची अत्यंत प्रेमाने काळजी घेत असत. सर्व
लोकही त्यांच्यावर मनापासून प्रेम करत असत.
परंतु त्या राज्यात असे काही लोक होते की जो
महाराज रावणाला आपला देव मानत असत.
बिभीषणाचा राग करत असत. ते लोक शक्तीशाली
होते. निसर्गबाहेरच्या अनेक शक्तींची ते आराधना
करत असत. त्या शक्तींच्या आधारावर महाराज
बिभीषणांचा वध करुन रावणाचे प्रतिनिधी म्हणून ते
राज्यकारभार सांभाळणार होते. रावणाच्या मृत
शरीरातून त्यांनी काही पेशी काढून एका स्त्रीच्या
गर्भाशयात सोडल्या होत्या. महाराज रावणांचा वारस
लवकरच जन्माला येणार होता." महाराज रावणांचा अनमोल
खजिना ते बिभीषणाकडून घेऊन जपून ठेवणार होते."

ते बोलायचे थांबले. "बस इतकच? महाराज
बिभीषण यांचा अपमृत्यू झाला होता हे माहित आहे.

पण त्यामागचे कारण हे होते ते आता कळले. पण महाराज रावणाचा वारस IVF द्वारे जन्माला येणार होता तो जन्माला आला का? याचा उल्लेख इथे नाही." राजेश सरांनी विचारले. ते भाषातज्ञ म्हणाले, "इथे इतकाच उल्लेख आहे. परंतु सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्याला नकाशानुसार गेल्यावरच मिळतील. आधी तो पाण्यातला मार्ग शोधायला हवा."

दुसऱ्याच दिवशी सकाळी पाणबुडे बोलवले. ते पाण्यात जाऊन एखादा मार्ग असल्यास तो शोधणार होते. नकाशा जूनाच होता. त्यामुळे त्यावेळी दिलेला मार्ग भूगर्भातल्या हालचालींमुळे बदलला असण्याची शक्यता होती. काही वेळाने एका पाणबुड्याने वर येऊन सांगितले मार्ग सापडला होता. पूर्वी तो कदाचित समुद्राच्या वर असेल पण आता पाण्यात गेला होता. एका कपारीतून गुहेसारखा मार्ग आत जात होता. पाणबुडी मागवण्यात आली. त्यात फक्त पाच जण आणि चालक इतकेच बसू शकत होते. राजेश सर, भाषातज्ञ प्रोफेसर खन्ना अजून दोघे आणि सई असे निघाले. सईचा पाणबुडीतला हा पहिलाच प्रवास होता. ते निघाले गुहेत शिरले आसपास काळोख दाटून आला. ती गुहा म्हणजे एक लांबच लांब रस्ता होता. तो संपता संपत नव्हता. तीन तास गेले तशी पाण्याची पातळी खाली खाली जाऊ लागली. समोर सपाट जमीन दिसण्याची चिन्ह दिसू लागली. थोड्याच वेळात ते एका मोठ्या सपाट पण काळोख्या पृष्ठभागावर उभे होते. त्यांनी हाय पॉवर टॉर्च लावले. तो भाग इतका मोठा होता की त्यांना जेमतेम दिसत होते. इतक्यात सईला गुहेच्या भिंतीवर एक आदिवासी एका राजाला हातील भाला मारतो आहे, असे चित्र होते. ते दिसले



Scanned with OKEN Scanner

नकाशातली एक खूण तर दिसली होती. ते योग्य
मार्गावर होते याची त्यांना खात्री पटली. पुढची खूण
शोधण्यासाठी त्यांना भाला रोखलेल्याच्या म्हणजे
राजाच्या चित्राच्या मागच्या बाजूने जायचे होते. सईने
त्या चित्राचा फोटो घेतला आणि कॅमेरामध्ये फोटो
नीट आला आहे ना हे पाहिले. तेव्हा तिला त्याखाली
काही अक्षरे आढळली ती भाषातज्ञांना दाखवताच. ते म्हणाले
"यात लिहिले आहे की, 'महाराज बिभिषणांचा मंत्रांनी
वध'. मला वाटते की हा भाला प्रतिकात्मक आहे.
बिभिषणाचा वध मंत्र मारून केला असावा." ते पुढे
निघाले रस्ता वळून पुढे गेला होता. तिथे नैसर्गिक रित्या
तयार झालेले असले तरी ते कोरले होते. "इतकं सुंदर
कोरीवकाम तेही अशा जागी?" सईने विचारले. राजेश
सर बोलले, "पहिले ही जागा अशी नसेल कोणास ठाऊक!"
त्यातल्याच एका खांबावर एका जोडप्याचे बाळ हातात
घेतलेले चित्र होते. नकाशातली दुसरी खूण सापडली.
त्याखाली लिहिलेले भाषातज्ञांनी सांगितले, "महाराज
रावणाचा वारस जन्माला आला." आता त्या विशाल
खांबाला वळसा घालून पुढे जायचे होते. पुढे गेल्यावर
एका भिंतीवर एका साधारण पाच वर्षाच्या मुलाचे
चित्र होते. खाली लिहिले होते युवराज 'राजवीर' तो
मुलगा बोट दाखवत असलेल्या दिशेने जायचे होते.
ते निघाले. मात्र समोर जाऊन थबकले दूरवर
त्यांना पाच गुहेची द्वारे दिसत होती. नकाशावर
तर तसे काहीच नव्हते. इतक्यात सईला एक विव्हळण्याचा
आवाज आला. सगळ्यांनी तिकडे पाहिले तेव्हा त्यांना
एक अस्थिपंजर अवस्थेतला माणूस दिसला. त्याला
कितीतरी दिवसात अन्न-पाणी मिळालेले नसावे.
सई तिकडे जाणार तोच राजेश सर म्हणाले

Scanned with OKEN Scanner

"आपल्या ध्येयाकडे लक्ष द्या. साई आपण इकडे कशासाठी आलो आहोत याचे भान ठेव. आता हा पाच रस्त्यांचा मोठा पेच निर्माण झाला आहे. आपण पाच जण पाच रस्त्यांनी जाऊ. वॉकी-टॉकी वर संपर्कात राहू." साईने परत त्या माणसाकडे पाहिले तो उजवीकडून दुसऱ्या रस्त्याकडे बोट दाखवत होता. सगळे राजेशसरांचं बोलणं ऐकत होते. सर्वांना पाच रस्त्यांनी जायची कल्पना मान्य होती. साई एकटी मुलगी असल्याने सगळ्यांनी तिच्याकडे पाहिलं. तिने पटकन त्या माणसाने दाखवलेल्या गुहेकडे बोट केलं, "सर मी त्या गुहेतून जाते." राजेश सर मान हलवत म्हणाले, "ठीक आहे. मग चला तर! एक सांगतो कुमारी सर्वांची जबाबदारी माझ्यावर आहे. कोणताही धोका पत्करायचा नाही."

ते निघाल्यावर साई हळूच मागे आली आणि बॅगमधले सँडवीच आणि पाणी त्या माणसाला दिले. अन्न पोटात गेल्यावर त्या माणसात आश्चर्यकारक बदल झाला. तो व्यवस्थित उठून बसला आणि म्हणाला, "मुली! तुझे माझ्यावर अनंत उपकार आहेत. किती युगे उपाशी होतो! तू दया दाखवली नसतीस तर या शापातून मुक्त झालोच नसतो. तुम्ही पुढे गेलात तशी आशा मावळली पण तू आलीस आणि मला शापमुक्त केलेस. किती हजार वर्षे इथे मनुष्यप्राणी आलाच नाही. पण आता मी मुक्त झालो, तुझ्यामुळे आणि त्याबदल्यात मी तुला एका अद्भूत अशा गोष्टीचे दर्शन घडवणार आहे." तो तडातड पुढे चालू लागला. साईला मागून अक्षरशः धावावे लागत होते.

मध्याचे दिनादिन रूप खरे की आतले हेच तिला कळेना. त्या दोघांनी गुहेत प्रवेश केला. आत खूप काळोख होता. सईची टॉर्च चालूच होत नव्हती. त्या माणसाने भिंतीतली एक मशाल काढली, ती सईच्या हातात दिली. खिशातल्याच दोन गारगोट्या उचलून त्या घासून मशाल पेटवली. सईकडे बघून म्हणाला, "तुमच्या जगातलं काही इकडे चालणार नाही." तो आणि सई पुढे पुढे आणि आत आत निघाले. मशालीच्या हलत्या उजेडात सईला भिंतीवरची अनेक चित्रे दिसत होती. त्यात एका छोट्या मुलाचा जीवनपट दाखवला होता. हा तोच मुलगा होता, जो आधी त्यांना बाहेरच्या भिंतीवर दिसला होता. मनात अनेक प्रश्न होते पण ते विचारायची तिला भिती वाटत होती. आपण एका अनोळखी माणसावर विश्वास ठेवला हे योग्य केलं का? अशा अनेक प्रश्नांचं काहूर माजलं होतं. आपण अनंतकाळ प्रवासच करत आहोत असं तिला वाटत होतं.

अचानक तो थांबला तिच्याकडे वळून म्हणाला, "तुझ्या मनात अनेक प्रश्न आहेत. हो ना? इथपर्यंत तुम्ही आलात म्हणजे तुम्हाला तो नकाशा मिळाला. आता त्या नकाशात नसलेल्या अनेक गोष्टी मी तुला सांगणार आहे. तुझं आधी शंका-निरसन करू."

"तुला इथपर्यंत तर समजलंच असेल की रावणाचा अंश एका स्त्रीच्या गर्भात सोडला गेला त्यातून एक पुत्र जन्माला आला. 'शंखवीर' हे त्याचे नाव तो. पुत्र जन्माला येताच रावणाच्या भक्तांनी (?) आपल्या मंत्रसामर्थ्याने महाराज विभिषण यांचा वध



Scanned with OKEN Scanner

केला. राजाधीरमध्ये जन्मताच महाराज रावणाच्या अनेक शक्ती होत्या. अल्प कालावधीतच त्याने शस्त्रविद्या, दिव्य अस्त्रे प्राप्त करून घेतली. तो लंकेच्या गादिवर बसला. आपल्या पित्याप्रमाणेच तो अत्यंत तेजस्वी परंतु गर्विष्ठ होता. त्याने बिभिषणाच्या बाजूच्या सर्वांना तुरुंगात डांबले होते. तो त्यांचे अनन्वित हाल करत होता. राजाधीर स्वतःच्या अधिकाराने तो इतका गर्विष्ठ झाला की आपल्याला जन्म देणाऱ्या मातेला व संगोपन करणाऱ्या पित्याला तो विसरला. जेव्हा एक दिवस ते दोघं त्याच्या दरबारात गेले तेव्हा त्याने त्यांचा अपमान केला. ते आपले जन्मदाते आहेत हे कोणाला समजू नये म्हणून त्याने त्यांना तुरुंगात टाकले. काही दिवसातच राजाधीरच्या राज्याला धोका निर्माण झाला. राजज्योतिषांनी भविष्य वर्तवले की लवकरच त्याचे राज्य धरतीच्या पोटात लुप्त होणार. राजाधीरने तिकडे दुर्लक्ष केले. तो नेहमीप्रमाणे तुरुंगातील कैदी बघायला गेला. त्यांच्या यातना पाहून त्याला अतिशय आनंद मिळत असे. त्याच्या मात्या-पित्यांना कित्येक दिवसात अन्न-पाणी दिले नव्हते. ते मृत्यूपंथाला लागले होते. राजाधीरला पाहताच ती माऊली उठली तिचे डोळे आग ओकत होते. ती म्हणाली, "हे राजा! ज्या मातेने तुला जन्म दिला तिचे उपकार विसरलास, तिला अन्नपाण्यावाचून तडफडत ठेवलेस, जिने आपले दूध पाजून तुला वाढवले. मी तुला शाप देते की तुझे हे राज्य, ऐश्वर्य सर्व नष्ट होईल. पण तू अनंतकाळपर्यंत जगशील. अन्न-पाण्यावाचून तडफडशील. जेव्हा माझ्याच वंशातली एक स्त्री तुला अन्न-पाणी देईल तेव्हाच तू मुक्त होशील"

हे ऐकल्यावर सई हादरली होती. मशालीच्या उजेडात त्याचे रुप पालटून समोर एक अत्यंत देखणा युवक आला होता. तो म्हणाला, "हो! मीच तो राजधीर. ज्याने आपल्या मात्या-पित्यांचे हाल केले. मीच तो दुर्दैवी राजा ज्याचे राज्य त्याच्या डोळ्यांसमोर नष्ट झाले. सर्व संपत्ती, वाडे, महाल एका प्रचंड भूकंपात धरणीच्या पोटात लुप्त झाले. फक्त एक वस्तू जी रावणाला परग्रहावरून आलेल्या एका अवकाशवासियाने भेट दिली होती. ती माझ्या माणसांनी वाचवली आणि आता तिच तू बघणार आहेस. चल!."

त्याने समोरच्या भिंतीतली एक गुप्त कळ दाबली. एका विशाल द्वारातून अवाक झालेली सई त्याच्यामागे गेली. समोर एक विशाल दालन होते आणि त्यात ते होते....

त्याला हिरे-माणके जडवलेली होती. ते संपूर्ण सोन्याचे होते. त्याच्या पुढे सात शुभ्र स्फटीकाचे घोडे होते. ते अद्भूत वाहन पाहून तिच्या तोंडून बाहेर पडले, "रावणाचे पुष्पक विमान!" राजधीर हसून म्हणाला, "हो! मनोवेगाने चालणारे त्रैलोक्यात प्रवास करु शकणारे, एकावेळी हजारो प्रवाशांना नेऊ शकेल असे अद्भूत पुष्पक विमान माझ्या वडिलांची एकमेव निशाणी."

सईला आपल्या बॅगेतल्या कॅमेराची आठवण झाली पण राजधीरने सांगितल्याप्रमाणे तिच्या जगातलं काहीच इथे चालणार नव्हते. राजधीर त्या विमानात बसला. त्या दालनाचं छत उघडलं आणि तो दूरवरच्या अंतरिक्ष प्रवासाला निघून गेला. पुष्पक विमानाच्या तेजाने दिपलेल

डोळे मिटले. डोळे उघडले तेव्हा ती गुहेच्या बाहेर उभी होती. तिची टीम समोरून येत होती. कोणालाच काही सापडले नव्हते आणि तिलाही. ते गुपित फक्त तिच्यासाठी होतं. त्या देखण्या पुष्पक विमानाचं दर्शन तिच्या मनावर कायमस्वरूपी ठसलं गेलं होतं.....

— समाप्त —

*टिप- ही कथा पूर्णपणे काल्पनिक आहे. कोणत्याही पौराणिक ग्रंथाचा या कथेशी संबंध नाही. *

Scanned with OKEN Scanner